'FORM-1 A



# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. १०/२३ वर्ष २०२३ दिनांक १६/०३/२०२३
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८ कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........ तारीख पासून २१/११/२०२२ रोजी १६.२० ते १७.२५ वा. दरम्यान
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा तारीख २१/११/२०२२ रोजी १२.०० वा.
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. १२/२३ तारीख १६/०३/२०२३ वेळ ११.३०
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस ८ कि.मी. बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, (सक्षम प्राधिकारी-१)
Address of Occurrence Name प्रशासकीय इमारत, A विंग, ३ रा माळा Ward of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
Nearest identifiable Place वांद्रे पूर्व. मुंबई ५१ Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री पुनमचंद सोलंकी (b) वडीलांचे / पतीचे नाव श्री विश्राम सोलंकी
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ४८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९७७३४४४९९९
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता रूम नं. एच - २६, बेस्ट कर्मचारी वसाहत, मतदार कार्ड नं.
Address Ward House Name/No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव राजकमल, टुडिओ मार्ग, परळ, मुंबई - १२
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अधिकाऱ्याच्या प्रथम खबरीला व स. अधिकारी फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. अमोल दयाराम सदावर्ते, ६० वर्षे, परिरक्षण भूमापक (सर्वेअर), झो.पु.प्रा. सक्षम प्राधिकारी-१ यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, A विंग, ३ रा माळा, वांद्रे - पू. मुंबई ५१

Scanned with OKEN Scanner

वरील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी वरील तक्रारदार श्री. पुनमचंद सोलंकी, ४८ वर्षे, यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर मराठीतून टंकलिखीत केलेला जबाब हाच नमूद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल समजण्यात येत आहे.

समक्ष

(प्रमोद वाघमारे)
पोलीस निरीक्षक
ना. म. जो. मुंबई

16/2/23

जबाब दि. १६/०३/२०२३

श्री. पुनमचंद विश्राम सोलंकी, वय ४९ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.ठि.- रूम क्र.एच- २६, बेस्ट कर्मचारी वसाहत, राजकमल स्टुडिओ मार्ग, परळ, मुंबई १२ मो.क्र.९७७३१४४६६९

मी वरीलप्रमाणे असुन नमुद पत्त्यावर ३ वर्षापासुन रहावयास आहे. मी पर्यायी लेखनिक या पदावर मध्य मुंबई बेस्ट बस आगार याठिकाणी नोकरी करीत असुन त्यातुन मिळणा-या उत्पन्नातुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

माझी आई श्रीमती मणीबेन विश्राम सोलंकी व माझा भाऊ श्री महेश विश्राम सोलंकी यांच्या नावावर एस.आर.ए. परिशिष्ट II प्रमाणे रूम नं. ८० व ८१, शास्त्री नगर, 'सी' विभाग, एकता चाळ कॉ.हा.सोसा., सायन कोळीवाडा, प्रतिक्षानगर, सायन, मुंबई २२ या रूम होत्या. सदर रूम या एस.आर.ए. योजनेकरीता व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये दि. १४/११/२०२१ रोजी निष्कासनाची कारवाई करून तोडण्यात आल्या होत्या. सदर योजनेमध्ये आम्ही सर्व्हेक्षणास विरोध केल्यामुळे एस.आर.ए. योजनेत आमच्या दोन्ही रूम या अपात्र घोषित करण्यात आल्या होत्या. सदरबाबत आम्ही मा. उच्च न्यायालयमुंबई येथे दाद मागितली असता मा. उच्च न्यायालयाने सहा आठवडयात आमचे रूम चे पात्रतेबाबत आदेश देण्याचे निर्देशित केले होते. सदरचे प्रकरण श्री. विश्वास गुजर, सक्षम अधिकारी-१, एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांच्या कार्यालयात दि. १७/०३/२०२२ रोजी आदेशाकरीता नस्तीबंद करण्यात आलेले होते.

माझी आई श्रीमती मणीबेन सोलंकी ही वयस्कर असल्याने माझे आईच्या व भावाच्या घराचे एस.आर. ए. मध्ये पात्रता कामाकरीता मी स्वत: एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई येथे मागील एका वर्षापासुन जात होतो. माहे ऑक्टोंबर २०२२ च्या शेवटच्या आठवडयात मी वरील कामाकरीता एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई येथे जावुन श्री. विश्वास गुजर, सक्षम अधिकारी-१ यांची भेट घेवुन माझे कामाबद्दल चर्चा केली असता त्यांनी आमच्या दोन्ही घरांच्या पात्रतेकरीता माझेकडे एकुण १३ लाख रूपए लाचेची मागणी केली. त्यावेळी मी सध्या माझेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगुन मी त्याची व्यवस्था करून पुन्हा भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो होता. माझे कामाकरीता मला कोणालाही लाच देण्याची माझी ईच्छा नसल्याने दि. दि. ०४/११/२०२२ रोजी मी addlcpacbmumbai@mahapolice.gov.in या ई मेल वर माझी तक्रार दिली होती. परंतु बरेच दिवस सदर तक्रारीबाबत मला प्रतिसाद न मिळाल्यामुळे मी दि. २१/११/२०२२ रोजी स्वत: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई याठिकाणी माझी लेखी तक्रार दाखल केली.

श्री. विश्वास गुजर, सक्षम अधिकारी-१, एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांनी माझेकडे रू १३ लाख लाचेची मागणी केल्याबाबत मी दिलेल्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता सहायक पो. आयुक्त नितीन जाधव व पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांची नेमणुक करण्यात आली होती. मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी दि. २१/११/२०२२ रोजीच करण्यात येणार असल्याचे मला सपोआ जाधव व पोनि वाघमारे यांनी मला सांगितले. त्याप्रमाणे पो.नि. वाघमारे यांनी दोन शासकिय पंचाना माझे समक्ष हजर करून त्यांना माझे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन त्याची पडताळणी करण्याकरीता श्री विश्वास गुजर यांचे कार्यालयात जावयाचे असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे सुमारे दु. ३.४५ वा. ला.प्र.वि. मुंबई कार्यालयातुन मी तसेच पोलीस पथक व दोन पंच असे शासकिय वाहनाने पडताळणीकरीता निघालो. त्यानंतर शासकिय वाहन हे इंडियन ऑईल कंपनी जवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, वांद्रे पु. मुंबई येथे थांबवुन मी व पंच श्री. मनोहर रामचंद्र शेळके, वय ५७

Scanned with OKEN Scanner

वर्षे, व्यवसाय - नोकरी ( उप व्यवस्थापक (वित्त व लेखा)), महावितरण, मुख्य कार्यालय,प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई यांना योग्य त्या सुचना देवुन लोकसेवक श्री विश्वास गुजर यांची भेट घेण्याकरीता पाठविण्यात आले होते. त्यानुसार मी व पंच शेळके यांनी श्री विश्वास गुजर यांची भेट घेवुन माझे कामाबद्द चर्चा केली असता त्यांनी या आठवडयात ई मेल द्वारे किंवा पोस्टाद्वारे आमचे घराचे एस.आर.ए. पात्रतेबाबत चे उत्तराचे पत्र पाठविण्यात येईल तसेच जर आठवडयात पत्र मिळाले नाही तर पुन्हा त्यांचे कार्यालयात येवुन सदरच्या पत्राची प्रत घेवुन जाण्यास सांगितले. त्यानंतर मी श्री गुजर यांच्या कार्यालयातुन बाहेर आलो असता त्यांचे कार्यालयाबाहेर बसणारे लोकसेवक परिरक्षण भुमापक श्री सदावर्ते यांचेशी झाली. त्यांचेसोबत माझे कामासंदर्भात चर्चा झाली असता त्यांनी माझे कामासंदर्भात त्यांचे वरिष्ठ लोकसेवक श्री विश्वास गुजर यांचेशी बोलुन माझे काम करून देतो तसेच त्यांना माझे कामाच्या पुर्ततेसंबंधात किती लाच द्यावयाची याचेही बोलणे करून घेतो असे मला सांगितले. तसेच लोकसेवक श्री सदावर्ते यांनी आमचे घराचे एस.आर.ए. पात्रतेबाबतचे काम करून देण्याकरीता माझेकडे प्रती सदनिका ५०,०००/- रू प्रमाणे आमचे दोन सदनिका पात्रतेकरीता माझेकडे एक लाख रू. लाचेची मागणी केली.

त्यानंतर आम्ही पुन्हा पोलीस पथकाजवळ परत आलो व लोकसेवक यांचे भेटीबाबत सपोआ जाधव व पोनि वाघमारे यांना सांगितले. त्यानंतर आम्ही पुन्हा ब्युरो कार्यालयास परत आलो. तसेच लोकसेवक व माझे झालेले बोलणे सपोआ जाधव व पोनि वाघमारे यांनी डी.व्ही.आर. मधुन ऐकले. सदर संभाषण ऐकुन सपोआ जाधव व पोनि वाघमारे यांनी सदर पडताळणीमध्ये लोकसेवक श्री विश्वास गुजर यांनी लाचेची मागणी केली नसुन त्यांनी पुढील आठवडयापर्यंत माझे काम झाले नाही तर पुन्हा कार्यालयास बोलावले असल्याने माझे काम या आठवडयात न झाल्यास पुढील आठवडयात पुन्हा लोकसेवक विश्वास गुजर यांना भेटुन पुन्हा पडताळणीची कारवाई करण्यात येईल असे मला संगितले. तसेच लोकसेवक श्री सदावर्ते यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या मागणीबाबत त्यांचे वरिष्ठांचा सल्ला घेवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे मला सांगितले.

दि. २१/११/२०२२ ते दि. २९/११/२०२२ पर्यंत आमचे घराचे एस.आर.ए. पात्रतेबाबत एस.आर.ए. कार्यालयाकडुन कोणतेही पत्र मला प्राप्त न झाल्यामुळे मा दि. ३०/११/२०२२ रोजी पा.नि. वाघमारे यांनी पुन्हा ला.प्र.वि. कार्यालयास बोलावुन घेतले व माझे काम अद्याप न झाल्यामुळे पुन्हा लोकसेवक श्री विश्वास गुजर, सक्षम अधिकारी-१, एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांची भेट घेवुन पडताळणी करण्यात येईल असे सांगितले. त्याप्रमाणे दि. २१/११/२०२२ रोजीप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करून मी व पंच श्री शेळके असे लोकसेवक यांचे कार्यालयात जावुन श्री गुजर यांची भेट घेवुन त्यांचेशी माझे कामाबद्दल चर्चा केली असता श्री गुजर यांनी माझा भाऊ श्री महेश सोलंकी याचे घर एस.आर.ए. करीता पात्र झाले असुन माझी आई श्रीमती मणिबेन सोलंकी यांचे घर अपात्र झाले असल्याचे सांगुन सदरचे पत्र आम्हाला पोस्टाने पाठविले असुन त्याचे सत्यप्रतिची झेरॉक्स प्रत मला देण्यात आली. सदरवेळी लोकसेवक श्री विश्वास गुजर यांनी माझेकडे लाचेची मागणी केली नाही. तसेच लोकसेवक श्री सदावर्ते यांना माझेवर संशय आला असवा त्यामुळे त्यांनी माझेकडे पुन्हा लाचेची मागणी केली नाही.

तरी मी लोकसेवक श्री विश्वास गुजर, सक्षम अधिकारी-१, एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांनी माझेकडे एस.आर.ए. योजनेत पात्रतेकरीता माझेकडे रु १३ लाख लाचेची मागणी केलेबाबत तकारीची दि. २१/११/२०२२ रोजी व दि. ३०/११/२०२२ रोजी सपोआ जाधव व पोनि वाघमारे व पथकाने पडताळणी केली परंतु सदर पडताळणीमध्ये लोकसेवक श्री गुजर यांनी माझेकडे लाचेची मागणी केली नाही. परंतु दि. २१/११/२०२२ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री विश्वास गुजर सक्षम अधिकारी-१, एस.आर.ए.

Scanned with OKEN Scanner

कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांचे कार्यालयात काम करणारे लोकसेवक श्री सदावर्ते, परिरक्षण भुमापक यांनी आमचे घराचे एस.आर.ए. पात्रतेबाबतचे काम करून देण्याकरीता माझेकडे प्रती सदनिका ५०,०००/- रू प्रमाणे आमचे दोन सदनिका पात्रतेकरीता माझेकडे एक लाख रू. लाचेची मागणी केली, म्हणुन श्री सदावर्ते, परिरक्षण भुमापक, एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांचेविरोधात माझी कायदेशीर तक्रार आहे. आज दि. १५/०३/२०२३ रोजी पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे, ला.प्र.वि. मुंबई यांनी मला मोबाईलद्वारे संपर्क साधुन त्यांचे वरिष्ठांनी लोकसेवक श्री सदावर्ते यांचेविरोधात गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली असल्याचे मला सांगितले. त्यामुळे मी आज रोजी प्रत्यक्ष ला.प्र.वि. कार्यालय, मुंबई येथे हजर राहुन लोकसेवक श्री सदावर्ते परिरक्षण भुमापक (सर्व्हेअर), एस.आर.ए. कार्यालय, वांद्रे पुर्व, मुंबई यांचेविरोधात तक्रार देत आहे.

माझा वरील जबाब हा मराठीत संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(अमोल वाघमारे)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि. मुंबई

१६/३/२३

Scanned with OKEN Scanner

(७६)

8 तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे
Reasons for delay in reporting by the complainant/informant पडताळणी नंतर वरिष्ठांचे आदेशाने

9 चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10 (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मुल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11 अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक —
Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मधील दोन सदनिका पात्र करून देण्याकरिता त्यांचे वरिष्ठ यांच्याशी त्यांचेसंदर्भात बोलणे करून घेतो असे सांगून त्यांच्या प्रति सदनिका ५०,०००/-रु. अशी दोन सदनिका पात्र करण्याचे कामा-करिता तक्रारदार यांचेकडे आलोसे यांनी एक लाख रु. लाचेची मागणी केली म्हणून त्यांचेविरोधात क. ७ भ्र.प्र. अधि. अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
अमोल वाघमारे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ , जिल्हा ........ , राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................. (3) Transferred to P.S ..................................... District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. [signature]

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature]
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...अमोल वाघमारे
पदनाम Rank ...पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई.
Code No. of I. O. ......................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख —
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner